# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

**शुक्रवार, दिनांक 08.03.2019 रोजी सकाळी 11.00 वाजता** नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकिय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री खान फारुख अली इलीयाज खान, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| अ. शमीम अब्दुल्ला साब | खान मसुद अहेमद खान उस्मान खान |
| येवनकर मोहीनी विजय | अ. लतीफ अ. मजीद |
| रावत भानुसिंह गयादनसिंह | कल्याणकर ज्योती किशन |
| कोकाटे करुणा भीमराव | वाघमारे दयानंद नामदेव |
| यन्नम राजेश लक्ष्मीनारायण | अ. रशीद अ. गणी |
| फारुख हुसेन कासीम पिरान | जाधव श्रीनिवास नारायणराव |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य उपआयुक्त प्रशासन श्रीमती गिता ठाकरे, प्रभारी मुख्यलेखा परिक्षक श्रीमती शोभा मुंढे, मुख्यलेखाधिकारी श्री संतोष कंदेवार, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**मोहीनी येवनकर** सर्वात प्रथम मी जागतीक महिला दिना निमीत हार्दिक शुभेच्छा देते. आपली महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षणाअंतर्गत **120** क्रमांकावरुन **60** व्या क्रमांकावर आलेले आहे त्याबददल मी आयुक्त महोदयांचे अभिनंदन करते, त्यांना शुभेच्छा देते. जे कर्मचारी स्वच्छतेचे काम करीत आहे त्यांचेही मी अभिनंदन करते. माझ्या प्रभागात बुध्द विहाराच्या परिसरात नाले सफाई करण्यासाठी विशेष पथक तयार करावे. पुढील महीण्यात **14** एप्रीलचा सण आहे. नागरीकांना त्रास होणार नाही. मा.आयुक्त व सहाय्यक आयुक्त स्वच्छता यांच्या मार्गदर्शना खाली आमच्या प्रभागाची सफाई चांगल्या रितीने होत आहे त्याबददल त्यांचे अभिनंदन करण्यात यावा

**सभापती** स्वच्छ सर्वेक्षणा अंतर्गत नांदेड महानगरपालिकेचा 60 व्या क्रमांकवर आल्यामुळे मा. आयुक्त श्री लहुराज माळी, श्रीमती गिता ठाकरे प्र. उपआयुक्त, श्री गुलाम सादीक सहाय्यक आयुक्त स्वच्छता यांचे अभिनंदन करण्यात येते.

ठराव क्रं. 132 **ठराव**

महाराष्ट्रात स्वच्छता अभियान अंतर्गत नांदेड महानगरपालिकेचा 7वा क्रमांक आल्यामुळे महपालिकेचे आयुक्त श्री लहुराज माळी, श्रीमती गिता ठाकरे प्र. उपआयुक्त स्वच्छता, श्री गुलाम सादीक सहाय्यक आयुक्त स्वच्छता यांचा अभिनंदन करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**अब्दुल लतीफ** स्थायी समितीच्या सदस्यांना लाईट देण्याचा विषय यापुर्वीच्या मिटींगमध्ये चर्चा करण्यात आली होती परंतू आता पर्यत लाईट काही पुरविण्यात आले नाही.

**मसुद अहेमद खान** लाईटचे लावण्याचे काम योग्य पध्दतीने होत नाहीत. आम्ही सांगुनही काम होत नाही हे चुक आहे.

**प्र. उप अभियंता(विधुत)** तीनशे लाईट बसविण्यात आले आहेत. यापुर्वी ही लाईट लावण्यात आलेले आहेत. त्या प्रभागाची यादी ही पुढील प्रमाणे आहे.

**मसुद अहेमद/अ. लतीफ** **300** लाईट हे कोणत्या प्रभागात लावले आहे याची माहिती देण्यात यावी.

**फारुख बदवेल** लाईट देण्यात येणार होते ते लाईट आतापर्यत दिलेले नाही.

**अब्दुल रशिद** स्थायी समिती सदस्यांना एक्ट्रा **10** लाईट देण्याचे सांगीतले होते ते लाईट लावलेले आहेत काय **?** यापुर्वी लाईट लावण्यात आलेले आहेत त्याची माहीती आम्हाला नको जास्तीचे लाईट लावले आहेत**,** त्याची माहिती देण्यात यावी.

**फारुख बदवेल** या अभियंत्याचे काम होत नसल्याने त्यांच्या कडून हे काम काढून घेण्यात यावे हे काम श्री ढवळे यांना देण्यात यावे.

**सभापती** मागील मिटींगमध्ये दोन दिवसात स्थायी समितीच्या सदस्यांना **20** लाईट बसविण्याचे सांगीतले होते ते लाईट बसविले काय हे सदस्य विचारणा करीत आहेत त्याची माहिती दयावी. अदयापर्यत हे लाईट बसविण्यात आले नाही.

**प्र. उप अभियंता(विधुत)** यन्नम साहेबांच्या वार्डात, मॅडमच्या वार्डात लाईट बसविण्यात आले आहेत. रावत साहेब यांच्या प्रभागात **7** लाईट लावण्यात आलेले आहेत. **10** लाईट लावण्यासाठी एक पुर्ण दिवस जात आहे. इतर कोणत्याही लाईनमनला काम करता येत नाही, चालू लाईन मध्ये लाईट लावण्यात येत आहेत. त्यामुळे लाईट लावण्यास उशिर होत आहे.

**राजेश यन्नम** **10** लाईट सर्वांना देण्यात यावे. आयुक्तांची मान्यता घेणे बाकी राहीले आहे असे काही सांगु नये. आता **14** एप्रील येत आहे त्यामुळे लाईट लावणे गरजेचे आहे. अब्दुल लतीफ : आमच्या प्रभागात एकही लाईट लावण्यात आलेला नाही. ते केंव्हा लावणार आहेत याची माहीती दयावी.

**मसुद अहेमद खान** एका दिवसात **10** लाईट हे लावत आहेत तर **20** प्रभागात हे कीती लाईट लावू शकतात. हे काम करीत नाही असे दिसुन येत आहे.

**अब्दुल रशिद** कंत्राटदार यांच्याकडे लोक नाहीत. यांनी का म्हणत आहेत त्यांच्याकडे दोन लोक आहेत म्हणुन यांनी काम करुन घेतले पाहीजे. कंत्राटदार काम करण्यास सक्षम नाही तर काम सोडून दिले पाहीजे. लेबर वाढ करणे हे त्या कंत्राटदाराची जबाबदारी आहे ती महापालिकेची नाही.

**सभापती** दोन दिवसात लाईट लावतो असे सांगीतले होते तरीही त्यात सुधारणा झाली नाही लाईट लावण्याच्या तक्रारी हे सदस्य करीत आहेत. आपण लाईट लावण्याच्या कामात कसुर केला आहे. मीटींग होवून **15** दिवस होवून गेले आहे. स्ट्रीट लाईट लावण्याच्या तक्रारी आहेत.सभागृहात आश्वासन दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आपली आहे.

**श्रीनिवास जाधव** आपण आम्हास **10** लाईट देणार असे सांगितले होते. परंतू आतापर्यत आम्हाला एकही लाईट दिला नाही, त्या संदर्भात आम्ही आपणास विचारणा करीत आहोत त्याऐवजी आपण आम्हाला इतर माहिती सांगत आहात. आपल्या **300** चे विचाराना करीत नाही आमच्या वार्डात कीती लाईट दिले त्याचा प्रश्न करीत आहोत उप अभियंता यांनी आम्हाला योग्य माहिती दयावी.

**उप आयुक्त(प्रशासन)** ज्या प्रभागात आतापर्यत लाईट लावले नाही आणि सदस्यांची मागणी लक्षात घेता विशेष करुन स्थायी समिती सदस्यांच्या प्रभागात या पुर्वी लावलेल्या लाईट नंतरही जास्तीचे किमान **10** लाईट लावण्यासाठी उप अभियंता यांना आदेशीत करण्यात येईल.

**सभापती** येत्या काळात **14** एप्रीलला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जंयती आहे हा सण असल्यामुळे शहरातील सर्व भागातील साफसफाईचे काम हाती घेण्यात यावे. ज्या एरीयात कार्यक्रमाचे आयोजन असते त्या एरीयात चुना इत्यादी टाकुन साफसफाई करण्यात यावी. साफसफाईचे काम चांगल्या पध्दतीने करण्यात येत आहे. त्याबददल स्वच्छता सहाय्यक आयुक्त यांचे अभिनंदन. श्री कुलकर्णी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात सफाई करीत असल्याबाबत त्यांचे अभिनंदन.

**फारुख बदवेल** खोजा कॉलनी येथील काम करावयाचे शिल्लक राहीले आहे. पाईप येणार होते आतापर्यत पाईप आलेले नाहीत त्या ठिकाणचे चेंबरवर कव्हर टाकले नाही. ते काम केंव्हा चालू करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी.

**सभापती** विषय पत्रिका चालू करावी.

**विषय क्रं.01**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 09 मध्ये रुपारुपा गेस्ट हाऊस ते वसंतनगर चौक ते यशवंत कॉलेज रोड श्री कुलकर्णी यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे

**संदर्भ** :- 1) कार्यालयीन आदेश क्रं नावाशमनपा/साबांवि/14173/2019 दिनांक 01.01.2019

2) कार्यालयीन पत्र क्रं नावाशमनपा/साबांवि/17313/2019 दिनांक 27.02.2019

3) कंत्राटदाराचे पत्र दिनांक 27.02.2019

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 09 मध्ये रुपारुपा गेस्ट हाऊस ते वसंतनगरचौक ते यशवंत कॉलेज रोड श्री कुलकर्णी यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी संदर्भ क्रं. 01 च्या आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार रुपये 58,75,200/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/15919/2019 दिनांक 31.01.2019 अन्वये दैनिक लोकमत (राज्यस्तरीय)/दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक तहेलका टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 02.02.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 16.02.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 4.99 % जास्त दर |
| 02 | ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड | 14.22 % जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 4.99 % जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास संदर्भ क्रं 02 अन्वये दर कमी करणेसाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी संदर्भ क्रं. 03 अन्वये लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.99 % जास्त दर जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची समंती दिली आहे.

करिता सदर कामासाठी जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती अंदाजपत्रकिय दराची निविदा मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 58,75,200/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेला निविदा मंजुरीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 133** **ठराव**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 09 मध्ये रुपारुपा गेस्ट हाऊस ते वसंतनगर चौक ते यशवंत कॉलेज रोड श्री कुलकर्णी यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे

**संदर्भ** :- 1) कार्यालयीन आदेश क्रं नावाशमनपा/साबांवि/14173/2019 दिनांक 01.01.2019

2) कार्यालयीन पत्र क्रं नावाशमनपा/साबांवि/17313/2019 दिनांक 27.02.2019

3) कंत्राटदाराचे पत्र दिनांक 27.02.2019

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 09 मध्ये रुपारुपा गेस्ट हाऊस ते वसंतनगरचौक ते यशवंत कॉलेज रोड श्री कुलकर्णी यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी संदर्भ क्रं. 01 च्या आदेशान्वये मान्यता दिल्यानुसार रुपये 58,75,200/- करिता ई-निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/15919/2019 दिनांक 31.01.2019 अन्वये दैनिक लोकमत (राज्यस्तरीय)/दैनिक पुण्यनगरी (राज्यस्तरीय)/दैनिक तहेलका टाईम्स या वृत्तपत्रात दिनांक 02.02.2019 अन्वये ई-टेंडरींग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 16.02.2019 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड | 4.99 % जास्त दर |
| 02 | ग्लोबल इन्टरप्रायजेस नांदेड | 14.22 % जास्त दर |

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 4.99 % जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधीतास संदर्भ क्रं 02 अन्वये दर कमी करणेसाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी संदर्भ क्रं. 03 अन्वये लेखीपत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.99 % जास्त दर जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्याची समंती दिली आहे.

करिता सदर कामासाठी जी.जे. कन्सट्रक्शन नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती अंदाजपत्रकिय दराची निविदा मंजुरीस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 58,75,200/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.02**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यावरील विविध ठिकाणचे खड्डे बुजविणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यावरील विविध ठिकाणचे खड्डे बुजविणेसाठी कार्यालयीन ई-दरपत्रक सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/16845/2019 दिनांक 16.02.2019 दैनिक वराक-ए-ताजा / दैनिक सोलापुर तरुण भारत या वृत्तपत्रात दिनांक 17.02.2019 रोजी दुस-यांदा ई-दरपत्रक मागवुन त्यास एकवेळ मुदतवाढ देवुन दरपत्रक मागविले असता फक्त (01) दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक निविदा समितीने मान्यता दिल्यानुसार दिनांक 02.03.2019 रोजी उघडले असता अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांचे दर प्राप्त झाले. अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेडयांनी भरलेले दर जास्तीचे वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/17497/2019 दिनांक 02.03.2019 अन्वये जास्त वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी लेखीपत्र देवुन त्यांनी भरलेल्या दराऐवजी एकूण 01 ते 06 बाबींसाठी अंदाजपत्रकीय दराने करण्याची समंती दिली आहे.

करिता सदर कामासाठी खालील प्रमाणे अचबलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती अंदाजपत्रकिय दरानपे मंजुरीस्तव तसेच नियमानुसार GST 12% वेगळयाने देणेस्तव व लागणा-या खर्चास अंदाजीत रुपये 05.00 कोटी मर्यादित प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

## शहरातील मुख्यरस्ते दुरुस्ती करण्याची यादी

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | अ.क्र. | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 01 | रेल्वे स्टेशन ते वजिराबाद पोलीस चौकी ते गुरुव्दारा गेट नं. 01 ते केळी मार्केट ते बर्की चौक (JNNURM रस्ता क्रं. 01 ते 04) | 02 | वर्कशॉप ते मुथा चौक |
| 03 | मुथा चौक ते जुना मोंढा टॉवर ते बर्की चौक ते देगलुर नाका | 04 | मुथा चौक ते गोवर्धनघाट ब्रिज ते लातुर रोड |
| 05 | गुरुव्दारा परिक्रमा-02 | 06 | गुरुव्दारा परिसरातील सर्व रस्ते |
| 07 | गांधी पुतळा ते महाविर चौक | 08 | हिंगोली गेट RUB ते चिखलवाडी चौक |
| 09 | वजिराबाद रोड ते बंदाघाट | 10 | रोड नं. 24 ग्यानमाता शाळा ते देगलुर रोड |
| 11 | सावरीकर बिल्डींग ते नावघाट | 12 | भगतसिंग रोड बाफना ते नविन पुल |
| 13 | देगलुर रोड ते केळी मार्केट (क्रेशर रोड) | 14 | लातुर रोड ते दुध डेअरी (साईबाबा कमान रस्ता), नावघाट ब्रिज ते दुध डेअरी |
| 15 | सिडको हडको भागातील मुख्य डांबरी रस्ते दुरुस्त करणे | 16 | विमानतळ सांगवी ते छत्रपती चौक |
| 17 | छत्रपती चौक ते रेस्ट हाऊस | 18 | शिवाजीनगर ROB ते नसरतपुर |
| 19 | शिवाजी पुतळा ते देगलु रोड | 20 | वर्कशाप टि पाईट ते नागार्जुना हॉटेल |
| 21 | भाग्यनगर टि पाईट ते व्ही.आय.पी. रोड ते रेल्वे स्टेशन | 22 | व्ही.आय.पी. रोड |
| 23 | हिंगोली गेट ROB / RUB ते MGM कॉलेज | 24 | आनंदनगर चौक ते महादेव दाल मील |
| 25 | D.Ed. कॉलेज रोड | 26 | गोकुळनगर चौक ते MSEB ऑफिस |
| 27 | फुले मार्केट ते पावडेवाडी नाका | 28 | मालेगांव रोड – मनपा हद्द |
| 29 | औद्योगिक वसाहत रस्ते | 30 | दिप नगर पाटी ते ज्ञानेश्वर नगर |
| 31 | बाबानगर STD ते रुपा गेस्ट हाऊस | 32 | ज्योती टॉकीज रोड |
| 33 | शिवाजीनगर ROB ते शिवाजीनगर डॉक्टर लाईन ते लालवाडी RUB | 34 | महाराणा प्रताप चौक ते बाफना ROB |
| 35 | हिंगोली गेट स्लिप रोड & RUB दक्षिण व उत्तर | 36 | रेल्वे स्टेशन ते देगलुर नाका |
| 37 | देगलुर रोड ते चौफाळा | 38 | दबकपुल ते संगतसाहित गुरुव्दारा |
| 39 | अक्सीस बँक ते खडकपुरा RUB | 40 | लातुर रोड पोलीस चौकी ते रविनगर चौक |
| 41 | आय.जी. ऑफिस ते लातुर रोडु | 42 | गांधी विद्यालय ते बडी दर्गाह |
| 43 | चुना भट्टी रस्ता | 44 | सराफा रस्ता ते नगरेश्वर मंदिर |
| 45 | दरबार मस्जीद ते नावघाट | 46 | मुनवरा मस्जीद ते अमिन कच्ची मुख्य रस्ता |

**अब्दूल रशिद** खुदबईनगर कमानीचा रस्ता, मुजाहीद चौक ते बाय पास पर्यतच्या रस्त्यावरील खडडे बुजविण्यात यावे. तसेच बरकत कॉम्पलेक्स ते गंज चौकापर्यतचा रस्त्याचा समावेश करावा.

**अब्दुल शमीम** रस्ता क्रमांक 9 च्या रस्त्याचा काही भागातील रस्त्यावरील खडडे, बुजविण्यात यावे. बरकत कॉम्पलेक्स ते टिपु सुनलतान रोड बायपास रोड समाविष्ट करण्यात यावा

**भानुसिंह रावत** रुपा गेस्ट हाऊस ते बाबानगर डाबरीकरण करणे व बाबा नगर ते रुपा गेस्ट हाऊस पर्यतचा रस्ता करणे.पुर्वी नगरपालिकेत असे चालत होत परंतू आता हे कसे काय याचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता(सांबावि)** हे चुकीने झालेले आहे यात दुरुस्ती करुन घेण्यात येईल.

**भानुसिंह रावत** चुकीने झाले असेल तर दुरुस्ती करुन घ्यावी पण मुरमरा गल्ली ते कालेजी टेकडी पर्यतच्या रस्त्यावरील खडडे बजवावे.

**नगरसचिव** प्रशासनामार्फत आयत्या वेळेसचा विषय आलेला आहे. सोनु इलेट्रीक्सचा विषय आहे, तो घेण्यात यावा. प्रस्ताव वाचुन दाखविला.

**अ. शमीम/मसुद अहेमद खान**मा. सभापती यांना अधिकार देण्यात येतात.

**भानुसिंह रावत** तय बाजारीचा विषय यापुर्वी महापालिका सभे ऐवजी स्थायी समितीच्या समोर ठेवण्यात आला नाही. त्यांना मुदत वाढ कश्याच्या आधारे दिली आहे.आपले वकील त्या ठिकाणी उपस्थित राहीले नाही काय हे सांगावे. आपली बाजू चांगली मांडणे आवश्यक आहे. ती का मांडण्यात आली नाही.

**नगरसचिव** सदर प्रकरणी न्यायालयाने निर्णय दिला असल्याने न्यायालयाने 30 एप्रील पर्यंत मुदत वाढ दिली आहे त्यानुसार ते तय बाजारीची वसुली करीत आहेत. त्यानंतर नविन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचे आदेश दिलेले आहेत.

**सभापती** श्री अ. रशीद व अ. शमीम यांनी सुचविल्यानुसार मुजाहेद चौक ते बायपास रस्ता, बरकत कॉम्पलेक्स ते जुना गंज व बरकत कॉम्पलेक्स ते टिपु सुलतान रोड बायपास रस्ता या दुरुस्तीसह प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**ठराव क्रं. 134** **ठराव**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यावरील विविध ठिकाणचे खड्डे बुजविणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यावरील विविध ठिकाणचे खड्डे बुजविणेसाठी कार्यालयीन ई-दरपत्रक सुचना क्रं. नावाशमनपा/साबांवि/16845/2019 दिनांक 16.02.2019 दैनिक वराक-ए-ताजा / दैनिक सोलापुर तरुण भारत या वृत्तपत्रात दिनांक 17.02.2019 रोजी दुस-यांदा ई-दरपत्रक मागवुन त्यास एकवेळ मुदतवाढ देवुन दरपत्रक मागविले असता फक्त (01) दरपत्रक प्राप्त झाले प्राप्त दरपत्रक निविदा समितीने मान्यता दिल्यानुसार दिनांक 02.03.2019 रोजी उघडले असता अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांचे दर प्राप्त झाले. अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेडयांनी भरलेले दर जास्तीचे वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साबांवि/17497/2019 दिनांक 02.03.2019 अन्वये जास्त वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीतांनी लेखीपत्र देवुन त्यांनी भरलेल्या दराऐवजी एकूण 01 ते 06 बाबींसाठी अंदाजपत्रकीय दराने करण्याची समंती दिली आहे.

करिता सदर कामासाठी खालील प्रमाणे अचबलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांनी लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती अंदाजपत्रकिय दरानपे मंजुरीस्तव तसेच नियमानुसार GST 12% वेगळयाने देणेस्तव व लागणा-या खर्चास अंदाजीत रुपये 05.00 कोटी मर्यादित प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**<u>शहरातील मुख्यरस्ते दुरुस्ती करण्याची यादी</u>**

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | अ.क्र. | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 01 | रेल्वे स्टेशन ते वजिराबाद पोलीस चौकी ते गुरुव्दारा गेट नं. 01 ते केळी मार्केट ते बर्की चौक (JNNURM रस्ता क्रं. 01 ते 04) | 02 | वर्कशॉप ते मुथा चौक |
| 03 | मुथा चौक ते जुना मोंढा टॉवर ते बर्की चौक ते देगलुर नाका | 04 | मुथा चौक ते गोवर्धनघाट ब्रिज ते लातुर रोड |
| 05 | गुरुव्दारा परिक्रमा-02 | 06 | गुरुव्दारा परिसरातील सर्व रस्ते |
| 07 | गांधी पुतळा ते महाविर चौक | 08 | हिंगोली गेट RUB ते चिखलवाडी चौक |
| 09 | वजिराबाद रोड ते बंदाघाट | 10 | रोड नं. 24 ग्यानमाता शाळा ते देगलुर रोड |
| 11 | सावरीकर बिल्डींग ते नावघाट | 12 | भगतसिंग रोड बाफना ते नविन पुल |
| 13 | देगलुर रोड ते केळी मार्केट (क्रेशर रोड) | 14 | लातुर रोड ते दुध डेअरी (साईबाबा कमान रस्ता), नावघाट ब्रिज ते दुध डेअरी |
| 15 | सिडको हडको भागातील मुख्य डांबरी रस्ते दुरुस्त करणे | 16 | विमानतळ सांगवी ते छत्रपती चौक |
| 17 | छत्रपती चौक ते रेस्ट हाऊस | 18 | शिवाजीनगर ROB ते नसरतपुर |
| 19 | शिवाजी पुतळा ते देगलु रोड | 20 | वर्कशाप टि पाईट ते नागार्जुना हॉटेल |
| 21 | भाग्यनगर टि पाईट ते व्ही.आय.पी. रोड ते रेल्वे स्टेशन | 22 | व्ही.आय.पी. रोड |
| 23 | हिंगोली गेट ROB / RUB ते MGM कॉलेज | 24 | आनंदनगर चौक ते महादेव दाल मील |
| 25 | D.Ed. कॉलेज रोड | 26 | गोकुळनगर चौक ते MSEB ऑफिस |
| 27 | फुले मार्केट ते पावडेवाडी नाका | 28 | मालेगांव रोड – मनपा हद्द |
| 29 | औद्योगिक वसाहत रस्ते | 30 | दिप नगर पाटी ते ज्ञानेश्वर नगर |
| 31 | मुरमुरा गल्ली ते कालेजी टेकडी | 32 | ज्योती टॉकीज रोड |
| 33 | शिवाजीनगर ROB ते शिवाजीनगर डॉक्टर लाईन ते लालवाडी RUB | 34 | महाराणा प्रताप चौक ते बाफना ROB |
| 35 | हिंगोली गेट स्लिप रोड & RUB दक्षिण व उत्तर | 36 | रेल्वे स्टेशन ते देगलुर नाका |
| 37 | देगलुर रोड ते चौफाळा | 38 | दबकपुल ते संगतसाहित गुरुव्दारा |
| 39 | अक्सीस बँक ते खडकपुरा RUB | 40 | लातुर रोड पोलीस चौकी ते रविनगर चौक |

| | | | |
|---|---|---|---|
| 41 | आय.जी. ऑफिस ते लातुर रोडु | 42 | गांधी विद्यालय ते बडी दर्गाह |
| 43 | चुना भट्टी रस्ता | 44 | सराफा रस्ता ते नगरेश्वर मंदिर |
| 45 | दरबार मस्जीद ते नावघाट | 46 | मुनवरा मस्जीद ते अमिन कच्ची मुख्य रस्ता |
| 47 | मुजाहेद चौक ते बायपास रस्ता | 48 | बरकत काम्पलेक्स ते जुना गंज रस्ता |
| 49 | बरकत काम्पलेक्स टिपु सुलतान रोड ते बायपास रोड | -- | -- |

**विशेष बाब म्हणुन आयेत्या वेळी घेण्यात आलेले**

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विरोधीपक्ष नेता निवडी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सौ. गुरुप्रितकौर दिलीपसिंघ सोडी यांची विरोधीपक्ष नेता पदी निवड केलेली असुन सदरील पदाच्या निवडी बाबत मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी मा. महापौर यांनी मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार विरोधीपक्ष नेता वर निवड करण्यात आलेले आदेश रद्द केलेले आहे. तरी या प्रकरणात मा. महापौर यांच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कर्तव्य पार पाडतांना सदर आदेश पारीत केला होता. त्यामुळे मा. महापौर यांच्या तर्फे करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालय येथे अपिल दाखल करण्यासाठी व सदरील प्रकरणासाठी विशेष अभिवक्ताची नियुक्ती/वकील लावण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला **अनुमोदक** :- दयानंद वाघमारे

**सभापती** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 135** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विरोधीपक्ष नेता निवडी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सौ. गुरुप्रितकौर दिलीपसिंघ सोडी यांची विरोधीपक्ष नेता पदी निवड केलेली असुन सदरील पदाच्या निवडी बाबत मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात आली होती. सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी मा. महापौर यांनी मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार विरोधीपक्ष नेता वर निवड करण्यात आलेले आदेश रद्द केलेले आहे. तरी या प्रकरणात मा. महापौर यांच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कर्तव्य पार पाडतांना सदर आदेश पारीत केला होता. त्यामुळे मा. महापौर यांच्या तर्फे करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालय येथे अपिल दाखल करण्यासाठी व सदरील प्रकरणासाठी विशेष अभिवक्ताची नियुक्ती/वकील लावण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय -** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 11 मधील मिल्लतनगर रोड (ESR) ते रस्ता क्रमांक 09 यांना जोडणा-या रस्त्याचे काम करण्यासाठी लागणा-या खर्च रुपये 36,45,390/- हे मनपा खर्च सालसन 2018-19 च्या अंदाजपत्रकातील नविन रस्ते / नविन नाल्या या लेखा शिर्षकाखालील करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- म. मसुद अहेमद खान **अनुमोदक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब

**सभापती** स. सदस्यांचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 136** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. 11 मधील मिल्लतनगर रोड (ESR) ते रस्ता क्रमांक 09 यांना जोडणा-या रस्त्याचे काम करण्यासाठी लागणा-या खर्च रुपये 36,45,390/- हे मनपा खर्च सालसन 2018-19 च्या अंदाजपत्रकातील नविन रस्ते / नविन नाल्या या लेखा शिर्षकाखालील करण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सभापती** नियमीत सभेचे कामकाज संपल्यामुळे अंदाजपत्रकिय विशेष सभा घेण्यात येईल.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली इलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.